**<u>नियमित दिवाणी दावा क्र.२८४/२०१३ मधील निशाणी ८० व ८५ वरील एकत्रीत आदेश</u>**

**(मालन घाडगे वि. भैराप्पा जावीर वगैरे)**

वादीने मयत प्रतिवादी क्र.१ यांचे नावापुढे मयत असा शब्द लिहून त्यानुसार त्यांचे वारस अभिलेखावर घेणेकरिता प्रस्तुतचे अर्ज दाखल केलेले आहेत. वादीच्या कथनाप्रमाणे, प्रतिवादी क्र.१ भैराप्पा दुर्गाप्पा जावीर हे दिनांक ३०.११.२०२४ रोजी मयत झाले आहेत. प्रतिवादी क्र.२ ते ८ हे अलहिदा प्रतिवादी क्र.१ यांचे वारस म्हणून अभिलेखावर आहेत. तसेच अर्जात नमूद केल्याप्रमाणे प्रतिवादी क्र.१ यांचे वारस आहेत. प्रतिवादी क्र.१ यांचे मृत्युचा दाखला वादी यांना वेळेत प्राप्त न झाल्यामुळे वारस अभिलेखावर घेणेकरिता झालेला विलंब माफ करुन घेणेकरिता तात्काळ अर्ज सादर करता आला नाही. त्यामुळे, मयत प्रतिवादी क्र.१ यांच्या नावापुढे मयत असा शब्द लिहून दुरुस्ती करुन त्यानुसार वारस अभिलेखावर घेणेची विनंती केली आहे.

२. प्रतिवादीतर्फे विधीज्ञांनी त्याच अर्जाच्या पाठीमागील बाजूस त्यांचे म्हणणे सादर केलेले आहे. त्यांच्या कथनानुसार, प्रस्तुत कामातील भैराप्पा यांना प्रतिवादी क्र.२ ते ८ व्यतिरिक्त कै. मुत्याप्पा भैराप्पा जावीर हा मुलगा होता. त्यास पत्नी व एक मुलगा असे देखील वारस आहेत. अर्जातील नमूद कारण चुकीचे असल्यामुळे अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

३. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकला. वादीने त्यांच्या कथनाच्या पृष्ठयर्थ नि.७७ कडे प्रतिवादी क्र.१ भैराप्पा दुर्गाप्पा जावीर यांच्या मृत्युचे प्रमाणपत्र दाखल केलेले आहे. सदर प्रमाणपत्राचे अवलोकन केले असता भैराप्पा दुर्गाप्पा जावीर हे दिनांक ३०.११.२०२४ रोजी मयत झाल्याचे दिसून येते. मयत प्रतिवादी क्र.१ यांचे वारस हे या दाव्याचे जरुरी पक्षकार झालेले आहेत. वादीने अर्जात नमूद केल्याप्रमाणे प्रतिवादी क्र.१ यांचे वारस नाहीत असा आक्षेप प्रतिवादींनी घेतलेला नाही. दाव्याचा गुणदोषांवर निपटारा होणेकरिता तसेच फलित व परिणामकारक हुकूमनामा होणेकरिता प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित ठरते. वादीने दाखल केलेले

नि.७८ व ८३ कडील विलंब माफीचा व दावावसान रद्द होवून मिळणेबाबतचे अर्ज मंजूर करण्यात आलेले आहेत. त्यामुळे, वादीस मयत प्रतिवादी क्र.१ यांच्या वारसाविरुध्द दावा चालविणेचा अधिकार असलेने व न्याय हिताचे दृष्टीने प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित ठरते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

(१) अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

(२) अर्जात नमूद केल्याप्रमाणे वादीने दाव्यात विहित मुदतीत दुरुस्ती करुन दुरुस्त अर्जाची प्रत अभिलेखावर दाखल करावी.

PRAKASH CHUNNI BACHHALE

Digitally signed by PRAKASH CHUNNI BACHHALE
Date: 2026.03.10 13:05:04 +0530

जत. **(प्रकाश चु. बछले)**

दिनांक – ०७.०३.२०२६ दिवाणी न्यायाधीश क. स्तर, जत.

# C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer. | : | R. B. Samalewale, Grade-3 |
| Court. | : | C.J.J.D. & J.M.F.C., Jath |
| Date | : | 07.03.2026 |
| the Presiding Officer on. | : | 10.03.2026 |
| Order uploaded on. | : | 10.03.2026 |